ISSN No-2031-5063 Vol.1,Issue.VI/Dec 2011pp.1-4

Research Paper

"भारत अमेरिकेतील वाढते सामरिक संबंध"
"Indo-US Growing Strategic Relations"

प्रा. डॉ. के. बी. पाटील
श्रीमती एच. आर. पटेल कला
महिला महाविद्यालय शिरपूर
जि. धुळे.

प्रस्तावना

झगाच्या सामरिक पर्यावरणात भारताची स्थिती अतिशय म्हत्वपूर्ण आहे. भारत चारही बाजूंनी अशा राष्ट्रांनी घेरला गेला आहे जे आज राजनितिक अस्थिरता व सैनिकी दृष्टीकोनातून आकर्षक केन्द्र बनले आहेत. उत्तरेत हिमालय भारतास चीनच्या सीक्यांग प्रान्त आणि तिबेट पासून वेगळा करतो तसेच उत्तर पूर्व क्षेत्राच्या प्राकृतिक रचनेवरून भारतास चीन तसेच म्यानमार पासून वेगळा करतो. पूर्वेत बांगला देश पश्चिमेस पोकस्तान तसेच दक्षिणेत श्रीलंका सारखे राष्ट्र आहेत ज्यात वर्तमान काळात दक्षिण आशियात अमेरिकेचे हितसंबंध आहेत यूरोप तसेच आशियाच्या भूसामरिक तसेच भूराजनैतिक बाबत भारताची केन्द्रीय स्थिती भविष्यात निर्णय भूमिका बजावू शकते.

भारताची सामरिक स्थिती :

पामर आणि परकिन्स यांच्या मतानुसार राष्ट्राची स्थिती तेथील संस्कृती आणि अर्थव्यवस्थेवर प्रभाव टाकत असते. देशाची स्थिती तेथील राजनिती आणि युध्दकौशल्यांचे निर्धारण करण्यास मदत करीत असते. श्री. जी. बी. केसी यांनी आपले पुस्तक "एशिया लॅंड एण्ड प्यूपिल्स पृ. 411 मध्ये लिहिले आहे कि भारत आपल्या सुयोग्य आकार असल्यामुळे सुरक्षा सम्बन्धी दृष्टीकोनातून महत्वपूर्ण स्थितीत आहे.

डॉ. केसी यांनी तर म्हटले आहे कि भारतास महाद्वीप म्हटले तरी चुकीचे ठरणार नाही कारण क्षेत्रफळ लोकसंख्या प्राकृतिक संसाधन आणि प्राकृतिक सीमा या दृष्टीने भारत सर्वाधिक महत्वपूर्ण स्थितीत आहे. भारताच्या भौगोलिक अभ्यासात क्षेत्रफळ जलवायु प्राकृतिक वनस्पती यांच्या व्यतिरिक्त देशाची स्थिती महत्वपूर्ण अशी आहे. भारत एशिया महाद्वीपाचाही एक खंड आहे. भारताच्या तीनही बाजूंना समुद्र आहेत. दक्षिणेत हिन्दी महासागरामुळे भारताचे दक्षिण एशिया क्षेत्रात विषेश भूसामरिक महत्व आहे.

भारत की भौगोलिक स्थिती व्यापार जलवायु आणि सुरक्षा या तीनही घटकांना प्रभावित करण्यासाठी महत्वपूर्ण आहे.

यूरोपातील सर्व राष्ट्रे उदा. फ्रान्स जर्मनी इटली स्विझर्लंड नॉर्वे स्वीडन इंग्लंड इ. ना 'स्वेज नहर' मार्गाकडून भारत अधिक जवळ आहे. जपान संयुक्त राज्य अमेरिका व कॅनडा यांना देखिल भारताकडून सिंगापूरच्या जलडमरूमध्य पासून सरळ जलमार्ग आहे. भारताची केन्द्रीय भौगोलिक स्थिती असल्यामुळेच ह्या राष्ट्रांशी आर्थिक राजनैतिक तसेच सांस्कृतिक संबंध स्थापीत करण्यात काहीही अडचण नाही. म्हणूनच राजनैतिक आर्थिक तसेच सांस्कृतिक संरचनेत भारताचे स्थान अद्वितीय आहे.

"भारत अमेरिका सामरिक संबंध""Indo-US Strategic Relations"

भारत आणि अमेरिका जगातील दोन मोठे व महत्वपूर्ण प्रजातांत्रीक देश आहेत. दोन्ही राष्ट्रांनी आपापल्या क्षेत्रात एक विशिष्ट स्थिती प्राप्त केली आहे. परंतू सामरिक शक्तीच्या संदर्भात मात्र दोन्ही राष्ट्रांची मते वेगवेगळी आहेत. विभिन्न शक्ती क्षमता असतांना देखिल दोन्ही राष्ट्रांत ऐतिहासीक सामाजिक भौगोलिक व राजनैतिक सन्दर्भात निश्चितच पहावयास मिळतात. विभिन्नता आणि समानतेच्या पश्चात ही दोन्ही देशांच्या दरम्यान संबंधाचा विकास त्यांचे राष्ट्र हित सैन्य व राजनैतिक क्षमता व विश्व व्यवस्था मधील त्यांच्या स्थितीव अवलंबून आहे.

स्वातंत्र्यानंतर आजपर्यंत अमेरिकेबरोबर भारताच्या सामरिक संबंधाचे मूल्यांकन केले तर सारखी चढावउताराची स्थिती दिसते. त्याचे संक्षिप्त स्पष्टीकरण पुढील प्रमाणे

1. 1947-1954 चे सामरिक संबंध
1. भारताच्या अलिप्तवादी धोरणास विरोध
2. भारताच्या एशिया समक्षीकरणास विरोध
3. भारत चीन संबंधीचे धोरण
4. अमेरिकेचे पाकीस्तान विषयीची धोरण
5. काश्मीर संबंधी दुटप्पी धोरण.

अ. भारताच्या अलिप्ततवादी धोरणास विरोध

भारताने सुरूवातीपासूनच अमेरिकेशी मित्रतापूर्ण संबंधावर भर दिला आहे. या संदर्भात भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी ऑक्टो. 1949 मध्ये अमेरिकेस भेट दिली. परंतु तरीही दोन्ही देशांमध्ये मैत्रीपूर्ण स्थिती निर्माण होवू शकली नाही. याचे महत्वाचे कारण म्हणजे आंतरराष्ट्रीय स्थिती. त्यावेळी रशिया व चीन यांचा साम्यवादाचा प्रसार रोखण्याचे अमेरिकेची नीती होती. म्हणून अमेरिकेने सैन्य संघटनांचे धोरण स्वीकारून साम्यवादाचा विरोध केला परंतू भारताने अलिप्ततेचे धोरण स्वीकारून सर्व प्रकारच्या सैनिकी संघटनांचा विरोध केला. अमेरिकेने भारताचा दृष्टीकोन न समजून जे त्यांच्या बरोबर नाहीत ते विरोधी आहेत असे समजले. शेवटी अमेरिकेचे तत्कालीन विदेश सचिव जॉन डॅलस यांनी अलिप्ततेच्या धोरणास अनैतिक व व्यर्थ म्हटले.

ब. भारताच्या आशिया समक्षीकरणास विरोध

भारताच्या आशियाबाबत सुरूवातीपासूनच भूमिका राहिली आहे. पं. नेहरू यांनी देखील आशियातील राष्ट्रांनी एकरूप होवून भूमिका मांडावी असे सूचित केले होते. इंडोनेशियाच्या संदर्भात नवी दिल्ली येथे आशिया महाद्विप राष्ट्रांची बैठक याचे उत्तम उदाहरण आहे. भारताची अशा प्रकारची स्वतंत्र भूमिका अमेरिकेस मान्य नव्हती. अमेरिका ह्या क्षेत्रात आपले वर्चस्व प्रस्थापित करण्याच्या स्थितीत होती. या संदर्भात बलदेव राज नैय्यर यांनी म्हटले आहे की भारताच्या नितिवर अमेरिका यासाठी विरोध करीत होती की भारत जगात एका नव्या शक्तीला जन्म देत आहे जी सैन्य संगठनवर आधारित नसून आशिया व अफ्रीकेच्या विशिष्ट वर्गाच्या राजनैतिक एकतेवर आधारित आहे. म्हणून आशिया सक्षम होण्यास अमेरिकेचा विरोध होता.

क. भारताचे चीन संबंधीचे धोरण

सन 1949 मध्ये चीनने माओत्सेतुंग च्या नेतृत्वाखाली साम्यवादी व्यवस्थेची स्थापना केली. परंतू अमेरिका मात्र चेंगकईशेक यांच्या सरकारला वास्तविक चीन मानत होती. एवढेच नव्हेतर संयुक्त राष्ट्राची सदस्यता तसेच

सुरक्षा परिषदेच्या स्थायी सीट साठी त्यांचा हक्क कायम ठेवला परंतू भारताने मात्र साम्यवादी चीनचे संयुक्त राष्ट्रसंघाच्या सदस्येत साठी समर्थन केले . भारताने केलेले समर्थन मात्र अमेरिकेस आपल्या विरोधी धोरण वाटले व भारता बरोबर कटुतापूर्ण व्यवहार सुरू झाला .

ड. अमेरिकेचे पाकिस्तान विषयीचे धोरण

अमेरिकेची पाकिस्तान संबंधीची नीती दोन्ही देशांच्य दरम्यान मतभेदास कारणीभूत आहे . अमेरिकेची दक्षिण आशियाच्या धोरणासंबंधी आकलन केल्यावर स्पष्ट होते की साम्यवादाचा विरोध करण्यात पाकिस्तानची मुख्य भूमिका आहे . याबाबत पाकिस्तानला अमेरिकेकडून होणारी सैनिकी सहाय्यता हा मूल्य पैलू आहे . अमेरिकेचे तत्कालिन राष्ट्राध्यक्ष हॉवर यांच्या **24** जानेवारी **1954** च्या पत्रानुसार त्यांनी पाकिस्तान बरोबर भारतास देखिल शस्त्रास्त्रे देण्याचे कबूल केले होते . परंतू पं . नेहरूंनी सांगितले की "जर आम्ही पाकिस्तानला सैन्य सहाय्यता देण्यास विरोध करतो तर आम्ही देखील अशी सहाय्यता स्विकारणे गैर सैद्धांतीक असेल" . परंतू पाकिस्तानला सैनिकी सहाय्यता करण्याचे धोरण मात्र अमेरिकेने कायम ठेवले .

इ . काश्मीर संबंधी अमेरिकेचे दुटप्पी धोरण

काश्मीर संबंधी अमेरिकेचे धोरण दृष्टीकोनाच्या विरूध्द असून भेदभावपूर्ण असे आहे . अमेरिका भारतावर पुन्हापुन्हा एका विशेष संदर्भात जनमत संग्रह करण्याच्या मागणीवर जोर देत राहिला . परंतू भारताकडून केलेल्या तकारींमुळे दुर्लक्ष करून पाकिस्तानने काश्मीरवर केलेल्या हल्ल्यांनतरही पाकिस्तानला अमेरिकेने आक्रमक राष्ट्र घोषीत केले नाही . यावरून अमेरिकेची भेदभावपूर्ण नीती स्पष्ट होते .

2 . 1995 मध्य ते 1971 या काळातील सामरिक संबंध

सुरूवातीला काळातच अमेरिकेचे धोरण भारतास आकृष्ट करावयाचे होते . याचे कारण म्हणजे सोविएट संघाच्या धोरणात बदल हेच होते . स्टॅलिनच्या मृत्युनंतर खुश्चेव यांनी शांतीपूर्ण सह असित्व चे धोरण अवलंबिले . तिर्सया जगातील राष्ट्रांना आर्थिक मदत करणे हे त्यांचे प्रमुख धोरण होते . अमेरिका देखील भारतास भरपूर प्रमाणात आर्थिक मदत करून भारतात वाढत असलेला रशियाचा प्रभाव कमी करण्याचे प्रयत्न होते .

भारतचीन युध्दाच्या वेळी अमेरिकेने भारताचे समर्थन केले . अमेरिकेकडून भारतपाक सैन्य समानतेच्या धोरणात परिवर्तन झाले . तसेच दक्षिण आशिया भारताचे स्थान मान्य झाले . भारताला आर्थिक सहकार्य बरोबरच सैनिक सहाय्यता देखील केली . सैनिकी सहकार्य जवळ जवळ **80** मिलीयन डॉलर पर्यंत होते . भारतपाक दरम्यान काश्मिर समस्येवर अमेरिकेने पूर्वीप्रमाणे प्रोत्साहन देण्याचे टाळले . तसेच पाकिस्तानने देखील या मुद्यावरून संघर्ष करण्याचे टाळावे असे सुचविले . **1965** मध्ये झालेल्या भारतपाक युध्दा संबंधी अमेरिकेच्या दृष्टीकोनात परिवर्तन दिसते . सर्वप्रथम अमेरिकेने पाकिस्तानकडून शस्त्रास्त्रांचा दुरूपयोग झाल्याचे सांगून भारत व पाक दोघांना शस्त्रास्त्रे देण्यास प्रतिबंध घातला . तसेच ताश्कंद कराराच्या वेळी अमेरिकेने तटस्थ भूमिका स्विकारली . **7** सप्टेंबर **1963** रोजी भारतअमेरिका यांच्यात एक महत्वपूर्ण करार झाला ज्यात अमेरिकेने भारतास **8** कोटी डॉलर तारापूर येथे अणूशक्ती संयत्र स्थापन करण्यास देण्याचे मान्य केले .

कटुता पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांनी मे **1965** मध्ये अमेरिकेचे राष्ट्रपती जॉन्सन यांच्या निमंत्रणावरून अमेरिका दौरा निश्चित झाल्याने अमेरिकेने भारताचे निमंत्रण मागे घेतले . परंतू जेव्हा अमेरिकेच्या या कार्यवाही वर नाराजी व्यक्त झाली तेव्हा अमेरिकेस अयूब खान यांचाही दौरा रद्द करावा लागला .

1965 ते **1971** पर्यंत भारतअमेरिका संबंधात कटूता निर्माण झाली . **1971** च्या बांगला देश युध्दातील अमेरिकेच्या भूमिकेवरून दोन्ही देशातील संबंधात दुरावा निर्माण झाला . या व्यतिरिक्त भारत व अमेरिका दरम्यान पश्चिमी तसेच दक्षिर्णपूर्व आशिया संदर्भातील परराष्ट्र धोरणाबाबत मदतभेद सुरू राहिलेत . पश्चिम आशियात भारत अरब राष्ट्रांच्या अधिकारांच्या बाजूने होता . तर अमेरिका इस्त्राईलचा कट्टर समर्थक होता . दक्षिर्णपूर्व आशियात अमेरिकेने व्हिएतनाम बरोबर प्रदिर्घ युध्द केले तर भारत त्यांची स्वतंत्रता एकीकरणाचा समर्थक राहीला . अमेरिका भारताच्या या कृतिबाबत नाखुश होती . अशा प्रकारे **1955** ते **1965** पर्यंतच्या कार्यकाळात दोन्ही देशांमध्ये निर्माण झालेल्या थोडयाफार मैत्रीपूर्ण संबंधांना **1971** मधील दोन घटना भारतरशिया संधी व भारतपाक युध्दाने पूर्णतः समाप्त केले .

3 . 1972-1979 या काळातील सामरिक संबंध

1972 च्या शिमला करारानंतर दक्षिण आशियात भारताची स्थिती भक्कम बनली . अमेरिकेने देखील आपली शक्ती वाढविण्यासाठी चीनशी संबंध सुधारले . तसेच भारतरशिया मैत्रीच्या स्वरूपात नवीन समीकरण समोर आले . **1973** मध्ये अमेरिकेकडून भारतास पुन्हा सैनिकी सहकार्य करण्याची घोषणा केली . परंतू भारताने ही गोष्ट सहजगत्या घेतली नाही . दिएगोगार्सीया येथे सैनिकी अड्डयांचा विस्तार व हिंदी महासागरातील वाढते सैनिकीकरण प्रकियाचा देखील भारताने विरोध केला .

1974 मध्ये भारताने पोखरण येथे शांततापूर्ण अनुस्फोट केल्यानंतर अमेरिकेने फक्त टिकाच केली नाही तर तारापूर येथील विद्युत केंद्राला सुरू असलेले परमाणु इंधन देण्याचे बंद केले . त्यामुळे दोन्ही राष्ट्रांदरम्यान तणावाचे वातावरण निर्माण झाले .

4 . 1980-1991 या काळातील सामरिक संबंध -

इंदिरा गांधींच्या दुर्सया शासन काळात भारताच्या आर्थिक सुधारणांना प्रारंभ झाला . या काळात भारतअमेरिका संबंधात सुधारणा झालेली दिसते . भारताचे आर्थिक उदारीकरणाचे कार्यक्रम तसेच अमेरिकेची आर्थिक स्थिती पाहता भारताशी मैत्री करणे अमेरिकेला हिताचे वाटू लागले . तर रिगन यांच्या काळात अमेरिकेचे आपल्या सामरिक कार्यक्रम विशेषतः आकाश युध्दा मुळे एक श्रीमंत राष्ट्रावरून कर्जदार राष्ट्रात परिवर्तन झाले . सैनिक सहयोगाच्या दृष्टीनेही ह्या काळात दोन्ही देशांच्या संबंधात अभूतपूर्व बदल झालेत . दोन्ही देशांच्या सैन्याचे सार्जसामानाची देवार्णघेवाण तसेच संयुक्त उत्पादनात क्षेत्रात देखील उल्लेखनीय वाढ झाली .

वरील सहकार्याचा अर्थ असा नाही की दोन्ही देशनांच्या दरम्यान कुठलेही मतभेद नाही . परंतु काही मुद्यांवर या काळातही मतभेद होते .

अ . काश्मीर प्रश्नावरून अमेरिकेच्या धोरणात काहीही परिवर्तन झालेले नाही .

ब . अमेरिकेकडून पाकिस्तानला शस्त्रास्त्रे पुरविणे सुरूच होते ते भारतास पसंद नव्हते .

क . भारताच्या अग्नी क्षेपणास्त्राच्या परिक्षणास देखील अमेरिकेने अयोग्य मानले .

ड . खाडी युध्दात अंतर्गत दबावामुळे भारतास अमेरिकेच्या विमानांना इंधन देण्याची सुविधा रद्द करावी लागली .

इ . परमाणु प्रसार तसेच प्रक्षेपास्त्र नियंत्रण या विषयी करार किंवा घोषणा करण्याचा आधार घेवून अमेरिकेने भारतावर अनेक प्रकारे दबाव टाकण्याचा प्रयत्न केला .

5. 1992-1998 या काळातील सामरिक संबंध -

अमेरिकेत या काळात भारताशी चांगले संबंध प्रस्थापित करणे आवश्यक वाटत होते . कारण क्षेत्रिय जबाबदारी पूर्ण करण्याच्या दृष्टीने दक्षिर्ण आशियात भारत अमेरिकेस महत्वपूर्ण वाटत होता . सोविएट संघाच्या विभाजना नंतर दक्षिर्णआशिया क्षेत्रात भारत पाकिस्तान पेक्षा विश्वासू वाटत होता . परंतू अमेरिकेचा काश्मीरबाबत दृष्टीकोन पाकिस्तानच्या बाजूनेच असल्यामुळे भारताची नाराजी झाली . तसेच परमाणू अप्रसाराचा मुद्दा देखील दोन्ही राष्टांदरम्यान वादाचा विषय राहिला . **1970** पासूनच अणू प्रसार बंदी करारावर स्वाक्षरी करण्यासाठी अमेरिका दबाव टाकत राहीली . परंतु **1995** मध्ये हा मुद्दा जास्त महत्वपूर्ण बनला . कारण अमेरिका अमर्यादित काळासाठी हा करार लागू करणार होती . त्याच प्रमाणे **1996** मध्ये सर्वसमावेश अणू प्रसार बंदी करार आणण्याचेही झाले . जेव्हा बारताचा दृष्टीकोन अमान्य केला तेव्हा भारताने

नकाराधिकाराचा वापर केला . परंतू अमेरिकेने आंतरराष्ट्रीय कायद्याच्या सर्व परंपराना झुगारून महासभेत मंजुरी मिळविली . म्हणून भारतअमेरिका संबंधात कटूता येणे स्वाभाविकच आहे .

आण्वीक प्रक्षेपणास्त्राच्या बाबतीत देखील अमेरिकेचा दृष्टीकोन भारताच्या विरोधी होता . सर्व प्रथम अमेरिकेने रशिया वर दबाव टाकून भारतास कायोजेनिक रॉकेट इंजिन न देण्याचे सांगितले . या व्यतिरिक्त भारताच्या अग्नी क्षेपणास्त्र सोडण्याला पुन्हा पुन्हा विरोध देखिल दोन्ही देशातील सामरिक संबंधात कटुंता निर्माण करणारे ठरले . वरील काळात अमेरिकेने भारताच्या प्रती मित्रत्वाच्या दृष्टीने न पाहता विषमतेचा दृष्टीकोन ठेवला . म्हणून शीतयुध्दानंतर देखील दोन्ही देशांमध्ये राजनैतिक तसेच सैनिकी क्षेत्रात कटुता निर्माण झाली .

6 . 1998 पासून ते आज पर्यंतचे सामरिक संबंध -

11 व 13 मे 1998 रोजी भारताने पोखरण येथे 24 वर्षानंतर दुसर्‍यांदा पाच अणूस्फोट केल्यानंतर अमेरिके बरोबर मतभेद आणखी वाढलेत . अमेरिकेने भारताच्या या कार्यवाहीवर खूपच टिका केली आणि भारता विरूध्द काही ठोस निर्णय घेण्याचे निश्चित केले . अमेरिकेने आपल्य 1994 च्या आण्विक प्रसार निषेध कायद्यांतर्गत भारतावर आर्थिक निर्बंध लादलेत . अमेरिकेच्या अशा प्रकारची निती भारतासाठी नवीन नव्हती . कारण यापूर्वी देखील अमेरिकेने भारताविरोधी अशा प्रकारच्या प्रतिबंधांचा आधार घेतला होता . 1974 मधील भारताच्या शांततापूर्ण अशा प्रकारच्या प्रतिबंधांचा आधार घेतला होता . 1974 मधील भारताच्या शांतातापूर्ण आण्विक परिक्षणानंतर 1990 च्या दशकातील प्रक्षेपास्त्र नियंत्रण व्यवस्थेत अंतर्गत तसेच 1992 मध्ये अन्तरिक्ष क्षेत्रात 'कायोजेनिक इंजिन' न देण्यासाठी रशियावर अमेरिकेने दबाव टाकला होता .

अमेरिकेस असे वाटते की परमाणू प्रसार झाल्याने इतर राष्ट्रांमध्ये भारताचे स्थान मजबुत होईल . आण्विक परिक्षणाच्या यशस्वीतेनंतर भारत एक आण्विक शस्त्र संपन्न राष्ट्र झाले आहे . परंतू अमेरिका अद्यापही अणू प्रसार बंदी कराराच्या वेळेच्या पाच अणूसंपन्न राष्ट्रांनाच तो दर्जा देत आहे . परंतू भारतास असे वाटते की भारतअमेरिका संबंधात सुधारणा व विकास होवून या सर्व प्रकारच्या प्रतिबंधांना रद्द करणे आवश्यक आहे . आज तरी अमेरिकेने लादलेले हे सर्व प्रतिबंध दुर केले असून भारत व अमेरिका संबंधात सुधरणा घडवून आणण्याच्या दृष्टीने दोन्ही राष्ट्रांकडून महत्वपूर्ण भूमिका घेण्याचे प्रयत्न होत असतांना दिसतात .

सद्यस्थितीत भारतअमेरिका सामरिक संबंध -

भारताला अत्याधुनिक इलेक्ट्रॉनिक्स रडार देण्याची घोषणा

अमेरिका व भारत यांच्यातील अब्जावधी डॉलरच्या लढावू जेट विमानांच्या करारांतर्गत भारतास अत्याधुनिक 'रेथॉन रडार' देण्याची अमेरिकेने घोषणा केली होती . अमेरिकी लष्कर पेंटॅगॉन तर्फे या कराराची पुर्तता देखील सुरू आहे . या रडार मुळे लढाऊविमानांची आक्रमकता अधिक वाढते व प्रतिकाराची शक्यता कमीत कमी राहते . भारततर्फे फेब्रुवारी 2006 च्या अखेरीस 126 मध्यम बहुउद्देशिय विमाने खरेदी करण्यासाठी निविदा दाखल करण्यात आली होती . या कराराची किंमत 5 अब्ज डॉलर इतकी होती .

अमेरिकेचे अध्यक्ष बराक ओबामा आणि भारताचे पंतप्रधान डॉ . मनमोहनसिंग या दोन्ही नेत्यांमध्ये सौदार्याचे संबंध आहेत . भारत व अमेरिका यांच्यात नुकताच अणुऊर्जा सहकार्य विषयक करार करण्यात आला . अमेरिकेची एकंदरीत आर्थिक स्थितीचा विचार केला तर भारतासारख्या राष्ट्राशी मैत्रीपूर्वक संबंध ठेवणे अमेरिकेच्याही हिताचेच असल्याचे दिसते . म्हणूनच अमेरिकेने भारताला महान देशाचा दर्जा दिल्यावद्दलचे वृत्त नुकतेच प्रसिध्द झाले आहे . त्यांनी पुढे असेही म्हटले आहे की हा देश स्वतःचे हित लक्षात ठेवूनच कोणतीही भूमिका निश्चित करीत असतो . आम्ही त्यांच्या धोरणात हस्तक्षेप करणार नाहीत असे अमेरिकेने स्पष्ट केले आहे .

निष्कर्ष

भारत व अमेरिका या दोन्ही राष्ट्रांच्या सामरिक संबंधाचा विचार केल्यास निष्कर्षप्रत असेच म्हणावे लागेल की दोन्ही देशांदरम्यान वादाचे प्रमुख कारण आंतरराष्ट्रीय भूमिका व या दोघामधील क्षमता असल्याचे दिसते . अमेरिकेने पूर्वीपासूनच एक मोठी शक्ती असल्याकारणाने भारतास कनिष्ठ दर्जा ची वागणुक दिली . अमेरिका एक महाशक्ती आहे परंतु भारत एक क्षेत्रिय शक्ती असल्याबरोबरच विकासाच्या दिशेने जाणारे शक्तीशाली राष्ट्र आहे . दोन्ही देशांदरम्यान मित्रत्वाचे संबंध असणे अनिवार्य आहे . परंतु जो पर्यंत दोन्ही देश एक दुर्सयाची भूमिका योग्य रितीने समजून घेत नाही तो पर्यंत दोघांमध्ये निःसंशय सामरिक संबंध प्रस्थापित होणे शक्य नाही .

संदर्भ :-

1 . Baart ka BaaOgaaoilak ivavaocana - Da^. ramaivalaasa vamaa- pana 1 - 2.

2. India's Foreign Policy & Relations - A Appadorai & M.S.Rajan New Delhi - 1983 - p.215.

3. Anti Americants in Third World : Smith- Newyork 1985 p.144.

4. America and India : Baldeo Raj Naiyar - New Delhi p.279.

5. South Asia and U.S. Policy : Narma D.Paman, P.26.

6. India's Nuclear Policy : K.K.Pathak : New Delhi 1980, P.22.

7. Year book on India's Foreign Policy, 1985-86 Delhi P.197-214

8. Indo US Dialog : Strategic Analysis : Vol.15 No.2.1992 page 115.

9. India & The New World Order : New Delhi, 1996 P.51-59.

10. U.S. and India Strategic Analysis : Baidam Vikas Basu : Vol.22, jan.1999 P.1630

News Papers :

1)The Times of India 2) Maharashtra Times

3) Nai Duniya 4) Loksatta

5) Lokmat